# श्री व्यंकटेश  महाविद्यालयात बौद्धिक संपदा हक्क विषयावर व्याख्यान

हातकणंगले तालुक्यातील इचलकरंजी येथील श्री ना.  बा. शिक्षण संस्थेच्या श्री व्यंकटेश  महाविद्यालयात कॉमर्स असोसिएशन तर्फे 'बौद्धिक संपदा हक्क' विषयावर व्याख्यान झाले. बुद्धिमत्तेला मालमत्तेच्यादृष्टीने पाहणे आणि तिचे मालमत्तेसारखे रक्षण करणे या मार्गाने अनेक देश गर्भश्रीमंत झाले आहेत. हा बौद्धिक मालमत्ता हक्क नेमका काय आहे, याची सविस्तर माहिती विद्यार्थी व शिक्षकांना व्हावी. त्यांच्या ज्ञानाच्या कक्षा रूंदाव्यात, संशोधन क्षेत्रात त्यांनी अग्रेसर राहावे, या हेतूने व्याख्यानाचे आयोजन केले होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व प्रमुख अतिथींची ओळख महाविद्यालयाचे सहाय्यक प्राध्यापक एडवोकेट श्री. अक्षय खांडेकर  यांनी केले. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून श्री. गणपतराव आरवाडे कॉलेज, सांगलीचे सहायक प्राध्यापक एडवोकेट पी. पी. चौगुले लाभले . त्यांनी बौद्धिक संपदा हक्क म्हणजे काय? तसेच पेटंट, कॉपीराईट, ट्रेडमार्क व इंडस्ट्रियल डिझाईन म्हणजे काय?, त्यांच्याशी निगडित कायदे आदींची माहिती दिली. प्रा. चौगुले  यांनी बौद्धिक संपदा हक्काविषयी महत्व सांगत तरुणांसमोरील आव्हाने सांगितली. तसेच संशोधनाची गरज स्पष्ट करत त्याची सुरवात कशी होऊ शकते, त्यासाठी प्रत्येकाने योगदान देण्याची गरज स्पष्ट केली. यावेळी महाविद्यालयाचे उप-प्राचार्य डॉ. बी. एन. कांबळे यांनी अध्यक्षीय मनोगतात विविध क्षेत्रामध्ये बौद्धिक संपदा हक्काचा वापर कसा झाला, यापुढे त्याचा वापर कसा केला जाऊ शकतो या विषयी माहिती दिली. या कार्यक्रमाचे आभार सहाय्यक प्राध्यापक श्री. एस. जी. धडके यांनी केले तर सुत्रसंचालन डॉ. एस. आर. ठाकर यांनी केले.

